**कौ.हि.म.सं. अर्ज क्र. १९/२०२१**

## निशाणी ५ वरील आदेश

(सौ. प्रियंका राजा यादव वि. श्री. राजा मुरुगन यादव व इतर)

अर्जदार हिने सदरचा अर्ज जाबदार यांच्याविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ नुसार दाखल केलेला आहे.

### अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –

२. मुळ अर्जामध्ये अर्जदार यांनी सविस्तर कथने केली आहेत. पुनरावृत्तीचा दोष टाळण्याकरीता अर्जातील संपुर्ण मजकूर या अर्जात घेतलेला नाही. मुळ अर्ज निशानी नं. १ या अर्जाचा एक भाग म्हणुन वाचण्यात यावा.

३. अर्जदाराने पुढे कथन केले की, अर्जदार व जाबदेणार नं. १ यांचा विवाह दि. १९/०१/२०१५ रोजी श्री अष्टविनायक विवाह कार्यालय, गगनकुंज बिल्डींग, कडवा गल्ली, जांभळी नाका, ठाणे येथे संपन्न झाला. अर्जदार व जाबदेणार यांनी सदर विवाहाची नोंद ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्या कार्यालयात केली असुन अर्जदार व जाबदेणार यांचा विवाह एकमेकांचे पसंतीने झालेला असुन लग्नानंतर अर्जदार ही जाबदेणार यांच्या घरी नांदण्यास गेली. लग्नानंतर जाबदेणार नं. १ याने दि. ०५/०२/२०१५ रोजी तमिळ संगम हॉल, वाशी येथे रिसेप्शनचा कार्यक्रम आयोजीत केला होता. त्याचा होणारा खर्च जाबदेणार नं. १ याने केला. अर्जदार व जाबदार क्र. १ हे वेगवेगळया जातीचे असून दोघांचा विवाह नातेवाईकांच्या संमतीने झालेला आहे. जाबदेणार नं. २ सासु व जाबदेणार नं. ३ नणंद असा अर्जदारशी नातेसंबंध आहे.

४. अर्जदाराने पुढे कथन केले की, अर्जदार ही जाबदेणार नं. १ बरोबर नांदण्यास गेल्यानंतर घरातील सर्व कामधंदा व्यवस्थीत करत होती. परंतु, अर्जदार व जाबदेणार हे वेगवेगळ्या समाजाचे असल्यामुळे घरातील व कुटुंबातील सर्व पध्दती वेगळ्या असल्यामुळे अर्जदार हीस त्याबाबत माहिती होण्यास थोडा अवधी लागला. जाबदेणार नं. १ हे व्यवसाय

करीत असल्यामुळे त्यांनी अर्जदार हीस नोकरी करण्याबाबत आग्रह केला. अर्जदार हिने पुढील शिक्षणासाठी जाबदेणार यांच्याकडे इच्छा व्यक्त केली परंतु त्यास त्यांनी साफ नकार दिला व "तु आई वडीलांकडेच सर्व शिक्षण पुर्ण करायचे होते." असे म्हणाले. अर्जदार ही सप्टेंबर २०१५ पासुन हिमालय ड्रग कंपनी रिटेल स्टोअर, वाशी येथे नोकरी करू लागली. नोकरीचा येणारा संपुर्ण पगार जाबदेणार नं. १ हे अर्जदार हिच्याकडुन घेत असे. अर्जदार ही नोकरी करून घरातील स्वयंपाक व इतर कामे वेळेत करत असे.

५. अर्जदाराने पुढे कथन केले की, अर्जदार ही दुस–या समाजाची असल्यामुळे जाबदेणार हे कोणत्या ना कोणत्या कारणावरून अर्जदार हीस घालुन पाडुन बोलणे, अपमानित करणे अशाप्रकारे वागण्यास सुरूवात केली. जाबदेणार यांच्या समाजात लग्नाचेवेळी मुलींचे माहेरहून देणगी स्वरूपात पैसे, दागीने व इतर वस्तु दिल्या जातात. त्याचप्रमाणे जाबदेणार नं. ३ हिचे लग्नाचेवेळी जाबदेणार नं. १ व २ यांनी वर पक्षाला ४० तोळे सोन्याचे दागीने दिल्याबाबत जाबदेणार हे अर्जदार समोर जाणुन बुजुन चर्चा करत असे. त्यामुळे माहेरकडुन दागीने व मानपानाकरीता पैसे दिले नाहीत म्हणुन जाबदेणार हे अर्जदार हीस अपमानित करून माहेरच्या लोकांबद्दल अपशब्द बोलु लागले. अर्जदार ही त्याकडे दुर्लक्ष करून घरातील काम करून नोकरीस नियमितपणे जात असे. अशाप्रकारे जाबदेणार यांनी अर्जदार हीस कसेबसे १ वर्ष व्यवस्थीत नांदवले. तरीसुध्दा अर्जदार हीने माहेरची परिस्थीती गरीबीची असल्याने सदर बाब माहेरी सांगीतली नाही.

६. अर्जदाराने पुढे कथन केले की, २०१५ च्या दिवाळी सणाकरीता अर्जदार ही माहेरी सासवड येथे आल्यानंतर अर्जदार हिचे आई वडीलांनी अर्जदार हीस कानातील कर्णफुले व वेल असे ०७ ग्रॅमचे तसेच जाबदेणार नं. १ यास दिवाळी भेट म्हणुन अर्ध्या तोळ्याची अंगठी दिली. अशाप्रकारे अर्जदार हिच्या आई वडीलांनी अर्जदार हीस २०१६ च्या दिवाळी सनापर्यंत संसार उपयोगी सर्व वस्तु व संपुर्ण फर्निचर खरेदी करून दिलेले आहे. तरीसुध्दा जाबदेणार हे अर्जदार हीस घरात कामधंदा करत नाही, संपुर्ण पगार घरात देत नाही. या कारणावरून त्रास देवु लागले. असे असताना अर्जदार ही आंतरजाती विवाह केल्यामुळे

जाबदेणार यांचा सर्व त्रास सहन करून नांदत होती.

७. अर्जदाराने पुढे कथन केले की, जाबदेणार नं. १ हे नेहमीच बाहेरच्या राज्यात व्यवसायानिमित्त जात असे व २–२ महिने घरी येत नसे. त्याबाबत विचारणा केली असता. जाबदेणार हे संगनमत करून अर्जदार हिस मारहाण करीत असे. ऑगस्ट २०२० मध्ये अर्जदार हिने जाबदेणार नं. १ यांच्या मोबाईलमध्ये त्याची मैत्रीण श्वेता कदम हिचेबरोबर वाढदिवस साजरा केल्याचे व इतर ठिकाणी काढलेले फोटो व व्हीडीओ पाहिले. सदरचे फोटो व व्हीडीओ शंकास्पद असल्यामुळे अर्जदार हिने त्याबाबत जाबदेणार नं. १ यांच्याकडे विचारणा केली असता, त्याने त्याची मैत्रीण श्वेता कदम हिस घरी घेवुन आले असता तिने अर्जदार हिस सांगीतले की, राजा व माझे कसलेही संबंध नाहीत असे सांगुन त्यांनी अर्जदार हिची समजुत काढण्याचा प्रयत्न केला. त्याकडे अर्जदार हिने दुर्लक्ष केले. तरीसुध्दा जाबदेणार नं. १ व श्वेता कदम हिने अर्जदार हिचा अपमान करून तिची थट्टा केली. जाबदेणार नं. १ याने अर्जदार हिची समजुत घालण्याऐवजी श्वेता कदम हिस आपल्या इमारतीतील सर्व खोल्या दाखवून बेडरूममध्ये जावुन दोघे गप्पा मारत बसले व अर्जदार हिस अपमान वाटेल असे वर्तन केले.

८. अर्जदाराने पुढे कथन केले की, जाबदेणार नं. १ याचे दुस–या मुलीशी असलेले प्रेमप्रकरण अर्जदार हिने घरात सांगीतल्यामुळे जाबदेणार नं. १ याने सोशल मिडीयावरील फेक अकाउंट वरील ति–हाईताचे संभाषण अर्जदार हिचे आहे असे सांगुन अर्जदार हिच्यावर संशय घेवुन खोटे आरोप करण्यास सुरूवात केली. त्यास दुजोरा देवुन जाबदेणार नं. ३ ही अर्जदार हिस फोनवर धमक्या देवु लागली. जाबदेणार हे अर्जदार हिस "घर खाली कर, माहेरी निघुन जा, आमच्या मुलाला तुझी गरज नाही, तुझे कपडे व सामान घराबाहेर फेकुन देवुन तुला मामाकडे नेवुन सोडुन देवु." अशाप्रकारे मारहान करून धमक्या देवुन जाबदेणार यांनी अर्जदार हिस शारीरीक व मानसिक त्रास देवुन छळ केलेला आहे. जाबदेणार नं. १ याची चुक असतानाही जाबदेणार नं. ३ ही अर्जदार हिचे माहेरी लोकांना फोनवर धमक्या देवु लागली. "तुमच्या मुलीला घेवुन जा, तुम्ही आला नाही तर तिला मामाकडे नेऊन सोडु." अशाप्रकारे आई वडीलांना धमक्या देवुन त्रास देवु लागले. जाबदेणार

नं. १ हे पुर्वीपासुनच तापट व विक्षीप्त स्वभावाचे असल्याने नोकरीस असलेल्या ठिकाणी त्यांचे ब–याच सहका–यांशी वाद होत असे. घरी आल्यानंतर त्याचा राग अर्जदार हिचेवर काढत असे. तरीसुध्दा अर्जदार हिने जाबदेणार यांच्याविरूध्द पोलीस स्टेशनला तक्रार केली नाही.

९. अर्जदाराने पुढे कथन केले की, वरील कारणावरून जाबदेणार यांनी अर्जदार हिस पुर्वीपासुनच शारीरीक व मानसिक त्रास देवुन छळ केलेला आहे. त्यामुळे अर्जदार हिचे वैवाहीक जीवन उध्वस्त झालेले आहे. तरीसुध्दा अर्जदार हिची जाबदेणार नं. १ बरोबर मनापासुन संसार करण्याची इच्छा होती व आहे. परंतु जाबदेणार नं. १ याने अर्जदार हिची देखभाल अथवा चौकशी केलेली नाही. तसेच अर्जदार हिचे अन्न, वस्त्र, निवारा इत्यादीबाबत दुर्लक्ष करून जाणुन बुजुन जबाबदारी टाळलेली आहे व अर्जदार हिस नांदवण्यास नकार देवून संसार सुखापासुन वंचीत ठेवलेले आहे. त्यामुळे अर्जदार हिस सदरचा तुर्तातुर्त पोटगीचा अर्ज जाबदेणार नं. १ यांच्याविरूध्द दाखल करणे भाग पडले आहे.

१०. अर्जदाराने पुढे कथन केले की, जाबदेणार नं. १ हा. ए.पी. इंजीनिअरींग, ए.पी.एम.सी. मार्केटजवळ, वाशी येथे नोकरीस असुन त्याला रू. २५,०००/– दरमहा पगार मिळत आहे. तसेच ऐरोली, नवी मुंबई येथे दोन मजली इमारत असुन दरमहा भाडे रू. १६,०००/– मिळत आहे. तसेच घनसोली, नवी मुंबई येथे शॉप असुन त्यास दरमहा भाडे रू. ८,०००/– मिळत आहे. तसेच विमानतळाजवळ, उरन, पनवेल येथे १ बी.एच.के. फ्लॅट असुन दरमहा भाडे रू. १०,०००/– मिळत आहे. तसेच ए टाईप अपार्टमेंट, वाशी येथे १आर. के. भाड्याने असुन दरमहा भाडे रू. ८,५००/– मिळत आहे. असे मिळुन जाबदेणार नं. १ यांस रू. ४२,५००/– दरमहा भाडे मिळत असुन पगार रू. २५,०००/– मिळत आहे. अशाप्रकारे जाबदेणार नं. १ यांच्यावर कुटुंबातील कोणीही व्यक्ती अवलंबुन नसुन जाबदेणार यांची आर्थिक परिस्थीती उत्तम आहे. जाबदेणार नं. १ याची अर्जदार यांना अन्न, वस्त्र, निवारा, पोटगी देण्याची ऐपत असुन त्यांनी कधीही अर्जदार यांची चौकशी व सांभाळ केलेला नाही. त्याबाबत वरीलप्रमाणे स्वतःची जबाबदारी टाळुन दुर्लक्ष केलेले आहे. तसेच जाबदेणार नं. १ यांचे उत्पन्न चांगले असुन त्यांना अर्जदार यांची नुकसान भरपाई, पोटगी व घरभाडे

देण्याची ऐपत आहे. अर्जदार हिस अन्य उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे अर्जदार यांना उपासमारीत दिवस काढावे लागत आहेत. वरील जाबदेणार यांनी अर्जदार यांचे खुप मोठे आर्थिक व मानसिक नुकसान केलेले आहे. अर्जदार हेचा स्वतःहुन त्याग करून अर्जदार हिस संसार सुखापासुन वंचित केलेले आहे व स्वतः स्वछंदी जीवन जगत आहे. त्यामुळे त्यांचेविरूध्द सदरचा तकारी अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

११. सदर अर्जावर जाबदेणार क्र. १ ते ३ यांनी नि. १२ कडे म्हणणे दाखल करुन अर्जामधील कथने अमान्य व नाकबूल केली आहेत.

१२. जाबदेणार यांनी अर्जदार व जाबदेणार यांचे नातेसंबंध मान्य केले आहेत. जाबदेणार यांच्या कथनानुसार अर्जदार व जाब देणार नं. १ हे यांच्या विवाहानंतर जाबदेणार यांच्या वैवाहिक घरी गुण्यागोविंदाने संसार करीत होते. अर्जदार यांचे औद्यागिक प्रशिक्षण कोर्स पुर्ण झालेला असून ते विवाहानंतर त्यांच्या कुवतीप्रमाणे नोकरी करीत होते. त्यातुन त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातुन बचत करुन उर्वरीत रक्कम स्वतःसाठी किरकोळ खर्चासाठी वापरत होते. जाबदेणार नं. १ हे वाणिज्य शाखेचे पदवीधर असून ते उदरनिर्वाहासाठी ए. पी. इंजिनियरिंग येथे नोकरी करीत होते. त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नामधुन जाबदेणार नं. १ कुटुंबातील सर्व जबाबदारी पार पाडीत होते. असे असले तरी जाबदेणार हे अर्जदार यांचेकडे पैशाची मागणी करीत नव्हते.

१३. जाबदेणार यांचे पुढे कथन आहे की, अर्जदार व जाबदेणार नं. १ यांचा विवाह प्रेमसंबंधातुन झालेला असून विवाहानंतर सुरूवातीचा काही काळ सुखद व आनंददायक गेल्यानंतर अर्जदार यांनी त्यांचे स्वभातील दुष्ट चेहरा दाखवण्यास सुरूवात केली. अर्जदार यांनी विवाहानंतर शिक्षण पुढे घ्यावे असा जाबदेणार यांचा कायम आग्रह असे. परंतु, अर्जदार यांनी शिक्षण घेण्याची कोणतीही तयारी दाखविली नाही. अर्जदार यांना मुंबईमध्ये एका खाजगी कंपनीमध्ये नोकरी मिळाल्यानंतर त्यातुन त्यांना चांगले उत्पन्न मिळत होते. असे असताना अर्जदार त्यांच्या वैवाहिक घरी कोणतीही घरातील कामे न करता केवळ संपुर्ण वेळ झोप व मोबाईल यात वाया घालवित असे. नोकरीवरुन घरी परतल्यानंतर अर्जदार या संध्याकाळी

आठ वाजेपर्यंत त्यांच्या खोलीमध्ये जाऊन झोप काढत असत. जाबदेणार नं. २ या स्वतः घरातील संपुर्ण दोन्ही वेळेचा स्वयंपाक व अर्जदार व जाबदेणार नं. १ यांचा डबा बनवत असे. अर्जदार या केवळ जेवण्यापुरत्या बाहेर येऊन पुन्हा त्यांच्या खोलीत झोपायला जात असत. दरवाजा बंद करुन अर्जदार मोबाईलवर अखंडपणे रात्री उशीरापर्यंत वेळ घालवत असत. या सर्वांमुळे अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे विवाहानंतर काही काळानंतर रूममध्ये अर्जदार व जाबदेणार नं. १ हे त्याच इमारतीत दुसऱ्या रुममध्ये राहू लागले. परंतु अर्जदार यांच्या वर्तवणूकीत कोणतीही सुधारणा झाली नाही. अर्जदार या कधीही स्वयंपाक न करता त्यांच्यासाठी बाहेरुन स्विगी, झोमॅटो इत्यादीवरुन खाद्यपदार्थ मागवित असत. इतकेच नव्हे तर अर्जदार या स्वतःची व कपड्यांची स्वच्छता करण्यास आळस करीत असत. अनेकदा अर्जदार या त्यांचे वैयक्तिक टॉवेल, कपडे दिवसेंदिवस धूत नसत. घरामधील झाडलोट, स्वच्छता पत्नी व घरातील सदस्य म्हणून कधीही करीत नसत. यासर्वांबाबत अर्जदार यांना जाबदेणार यांनी सांगितले असता त्या त्याकडे दुर्लक्ष करीत असे.

१४. जाबदेणार याचे पुढे कथन आहे की, अर्जदार या रात्री उशीरापर्यंत मोबाईलवर चॅट, मेसेजेस करीत असे याबाबत जाबदेणार नं. १ यांनी विचारले असता अर्जदार या कोणतीही खरी उत्तरे न देता स्वतःच्या नादात राहुन जाबदेणार नं. १ यांच्याशी संवाद ठेवत नव्हते. अर्जदार या त्यांच्या मोबाईलवर "स्टारमेकर" नावाचे ॲप डाऊनलोड करुन त्याद्वारे व इतर ॲपद्वारे इंटरनेटच्या माध्यमाने अनोळखी व्यक्तिंसोबत रात्री उशीरापर्यंत चॅट व मेसेजेस करीत असे. याबाबत जाबदेणार नं. १ यांनी अर्जदार यांचा मोबाईल पाहिला असता त्यांना त्यामध्ये हिमांशू नावाच्या अनोळखी पुरुष व्यक्तिसोबत अर्जदार या मोबाईलद्वारे रात्री अपरात्री तासंतास आक्षेपार्ह मेसेजेस करीत असल्याचे जाबदेणार नं. १ यांना दिसून आले. सदर हिमांशू नावाची व्यक्ति दिल्ली येथे असल्याचे व अर्जदार यांचेसोबत त्यांची मोबाईलवर मैत्री होऊन एकमेकांना भेटण्यासाठी नियोजन करीत असल्याचे जाबदेणार नं. १ यांना समजले. जाबदेणार नं. १ यांनी याबाबत अर्जदार यांना खुलासा विचारला असता अर्जदार यांनी अनोळखी व्यक्ति त्यांचा भाऊ असल्याचे सांगितले. परंतु, मोबाईलमधील आक्षेपार्ह फोटो व मजकुरावरुन

अर्जदार हे खोटे बोलत असल्याची जाबदेणार नं. १ यांची खात्री झाली होती. याबाबत जाबदेणार नं. १ यांनी अर्जदार यांच्या आईवडीलांना कळविले असता आईवडीलांनी अर्जदार यांना समज देऊन उपदेश करून असे न वागण्याबाबत कळविले.

१५. जाबदेणार याचे पुढे कथन आहे की, सन २०२० चे दरम्यान देशामध्ये कोव्हिड १९ महामारीमुळे टाळेबंदी असताना अर्जदार व जाबदेणार हे काही महिने एकत्र घरात वास्तव्यास असताना जाबदेणार नं. १ यांना अर्जदार यांचे विचित्र वागणुकीबद्दल संशय आला याकाळात अर्जदार या सातत्याने त्यांच्या शयनखोलीत तासंतास दार बंद करुन बसत असत. घरातील कोणतीही कामे न करता त्यांच्या स्मार्ट फोनमधील इंटरनेटद्वारे अखंडपणे व्हिडियो व व्हॉईस कॉल्स, चॅटींग, तसेच त्यांचे खाजगी फोटो अनोळखी पुरुषासोबत पाठविताना जाबदेणार नं. १ यांनी त्यांना पकडले व विचारले असता त्यांनी जाबदेणार नं. १ यांना असे उत्तर दिले की, "माझ्याकडुन नकळत खुप मोठी गंभीर चुक झाली आहे, मला माफ करा" यावर जाबदेणार नं. १ यांनी कदाचित अर्जदार या सुधारतील या अपेक्षेने त्यांच्यासोबत वैवाहिक संबंध सुरु ठेवले. परंतु काही दिवसातच अर्जदार या पुन्हा एकदा त्यांच्या मोबाईल फोनद्वारे अनोळखी परपुरुषासोबत अशोभनिय व खाजगी प्रकारचे चॅटींग करीत असल्याचे जाबदेणार नं. १ यांना दिसून आले. त्यावर जाबदेणार यांनी अर्जदार यांच्या कुटुंबियांना तत्काळ कळविले. अर्जदार यांना जाबदेणार नं. १ याचेकडून त्यांच्या मोबाईलमधील गैरवर्तवणूकीबाबत माहिती झाल्याचे समजले असता अर्जदार यांनी त्यांच्या मोबाईलमधील हिमांशू नावाचा नंबर बदलून इतर नावाने सेव्ह केला व त्याच्यासोबत अर्जदार यांचे गैरवर्तवणूक व आक्षेपार्ह चॅट, व्हिडियो कॉल सुरुच ठेवले होते. जाबदेणार नं. १ यांनी अर्जदार यांचा मोबाईल पाहिला असता हि माहिती झाल्यानंतर जाबदेणार नं. १ यांनी अर्जदार यांना सुनावले व त्वरीत सदर अनोळखी व्यक्तिशी सर्व प्रकारचे संबंध तोडून देण्यास सांगितले.

१६. अर्जदार या जाबदेणार नं. १ यांच्या कायदेशीर पत्नी असताना अर्जदार या अशा प्रकारे अनोळखी व्यक्तिशी मोबाईलद्वारे अश्लिल व आक्षेपार्ह फोटो, चॅट, मेसेजेस करणे हे गैरवर्तवणूक असल्याने चुकीचे आहे असे अर्जदार यांना जाबदेणार नं. १ यांनी सांगितले व

त्यांच्या आईवडीलांशी लगेचच संपर्क करुन त्यांना याबाबत सर्व माहिती दिली. त्यानंतर अर्जदार यांचे आईवडील मुंबईला आल्यावर ते जाबदेणार नं. १ यांना न भेटता थेट अर्जदार यांच्या ऑफिसमध्ये जाऊन त्यांनी जाबदेणार नं. १ यांच्या मेहुण्याला फोन करुन घडलेल्या प्रसंगाची माहिती दिली. जाबदेणार नं. १ यांचे मेहुणा यांनी अर्जदार यांच्या आईवडीलांना समजावून सांगून अर्जदार यांना याबाबत कडक शब्दात बोलण्याविषयी अर्जदार यांच्या आईवडीलांना सांगितले. त्यानंतर अर्जदार यांचे आईवडील अर्जदार यांना घेऊन त्यांच्या माहेरी गेले.

१७. जाबदेणार याचे पुढे कथन आहे की, अर्जदार यांच्याशी व त्यांच्या आईवडीलांशी जाबदेणार हे फोनवरून व प्रत्यक्ष संपर्क करीत असताना अर्जदार यांनी त्यांच्याकडून चुक घडल्याचे जाबदेणार यांचेसमोर व स्वतःच्या आईवडीलांसमोर कबूल केले आहे. परंतु, यासर्व गोष्टींवर आपली चुक लपविण्यासाठी अर्जदार या जाबदेणार यांचे विरुध्द खोट्या तक्रारी व मारहाण व छळ केल्याची खोटी बतावणी करून प्रस्तुतचा अर्ज सादर केलेला आहे.

१८. जाबदेणार याचे पुढे कथन आहे की, अर्जदार हे त्यांचे वैवाहिक आयुष्यात पत्नीप्रमाणे कोणतेही कर्तव्य पार पाडीत नाहीत. जाबदेणार नं. १ यांना कोणत्याही प्रकारचे वैवाहिक सुख न देता त्यांना अपत्याची असलेली इच्छा पुर्ण न करता कोणतेही सहकार्य अर्जदार करीत नाहीत. जाबदेणार नं. २ अर्जदार यांची त्यांच्या मुलीप्रमाणे सेवा व काळजी घेत असून त्यांच्या वृद्धापकाळात व आजारी असून सुद्धा अर्जदार यांच्यासाठी स्वयंपाक व घरातील कामे आनंदाने करीत असतात. जाबदेणार नं. ३ या त्यांच्या विवाहानंतर मुलुंड (पुर्व) येथे राहत असून ते त्यांच्या संसारात सुखी आहेत. जाबदेणार नं. ३ हे अर्जदार यांच्या वैवाहिक आयुष्यात हस्तक्षेप करीत नाहीत. अर्जदार यांना जाबदेणार यांचे कडुन कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक छळ, हिंसाचार, शिविगाळ, मारहाण कधीही झाली नाही किंवा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कोरोना काळात जाबदेणार नं. १ यांची नोकरी केवळ अर्जदार यांच्या अशा बेताल वागणुकीमुळे व त्यांचे मनावर असलेल्या सततच्या दडपणामुळे कमी झाली असल्याने

सध्या अर्जदार हे कोणत्याही कायमस्वरुपी नोकरीत नसून तुटपुंज्या पगारावर तात्पुरत्या स्वरुपात आहेत. जाबदेणार नं. १ यांनी घराच्या नुतनीकरणासाठी व इतर कारणांसाठी घेतलेल्या कर्जाचे हप्ते जाबदेणार नं. १ यांना भरावे लागत असून जाबदेणार नं. १ यांच्यावर त्यांची वृद्ध आई व तिच्या आजारपणातील खर्चाचा भार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज व निशाणी नं. ५ वरील अर्ज हा विनाकारण केलेला असून त्यामध्ये केलेली मागणी बेकायदेशीर असून रद्दबातल स्वरूपाची आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

१९. अर्जदारतर्फे लेखी युक्तीवाद निशाणी क्र. १७ कडे दिला आहे. तसेच जाबदेणार तर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

२०. अर्जदार व जाबदेणारचे कथनावरुन त्यांना नातेसंबंध मान्य असल्याचे स्पष्ट होते. अर्जदाराने अर्जामध्ये कथन केले आहे की, लग्नानंतर जाबदेणार यांनी तिला कौटुंबिक हिंसाचार केला. तसेच कौटुंबिक घटना अहवालामध्ये जाबदेणार यांनी अर्जदार हिस केलेले कौटुबिक हिंसाचारात नमूद केलेले आहे. अर्जदाराने तिच्या अर्जातील कथनापृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. यावरुन प्रथमदर्शनी अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे दिसून येते. त्यामुळे जाबदेणार क्र. १ हा अर्जदारचा पती म्हणून तिचे पालनपोषण करण्यास बांधील आहे. अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्यापासून जाबदेणार यांनी तिच्या उदरनिर्वाहासाठी काय तरतूद केली याबाबत जाबदेणार यांनी काहीही कथन केलेले नाही. अर्जदार व जाबदेणार यांचे कथन पुराव्यानिशी सिद्ध होणार आहे. तोपर्यंत अर्जदारच्या उदरनिर्वाहाची तात्पुरती तरतूद करणे आवश्यक आहे. त्यासाठी अर्जदार हीस तुर्तातुर्त पोटगी मंजूर करणे आवश्यक आहे.

२१. अर्जदाराच्या कथनानुसार जाबदेणार यास दरमहा रक्कम रुपये ४२,५००/- एवढे भाडे रक्कम व रक्कम रु. २५,०००/- पगार मिळत आहे. दोन्ही पक्षकारांनी त्यांच्या उत्पन्नाबाबत व खर्चाबाबत शपथपत्र निशाणी क्र. ३४ व ३२ कडे अनुक्रमे दाखल केले आहे. जाबदेणार यांनी त्यांचा मासिक खर्च रक्कम रु. २७,१००/- एवढा नमुद केलेला आहे.

जाबदेणार यांच्या सदर प्रतिज्ञापत्रावरुन ते आईवर अवलंबून असल्याचे त्याचे कथन आहे. त्याला वयोवृद्ध आईला सांभाळावे लागते. त्याचे नावे फक्त दोन चाकी वाहन आहे याव्यतिरीक्त काही नाही. जाबदेणार यांचे आईचे नावे पनवेल, घनसोली, वाशी व ऐरोली येथे घरमिळकती असून त्यामधून दरमहा रक्कम रु. ३१,०००/– भाडे मिळते. जाबदेणार यांचेवर दरमहा अंदाजे रक्कम रु. २९,०००/– हप्ता कर्जापोटी जात असल्याचे नमूद केले आहे. जाबदेणार यांनी रक्कम रु. १३,००,०००/– पर्सनल लोन रक्कम रु. १,००,०००/– गाडी कर्ज रक्कम रु. १,५०,००० मोबाईल रक्कम रु. १८,०००/– असे कर्ज घेतल्याचे नमूद केले आहे. जाबदेणार यांच्या कथनानुसार अर्जदार हिस नोकरीतून दरमहा रक्कम रु. १५,०००/– एवढा पगार मिळतो.

२२. याउलट अर्जदारने तिच्या प्रतिज्ञापत्रामध्ये तिचे शिक्षण बी.कॉम पहिले वर्ष आय.टी.आय असे नमूद केले आहे. अर्जदार हिचा वैयक्तिक खर्च रक्कम रु. १८,५००/– एवढा नमूद केला आहे व तिचा वैयक्तिक खर्च कोणाकडून केला जातो याबाबत प्रतिज्ञापत्रात नमूद केलेले नाही. अर्जदार हिचे उत्पन्नाबाबत तिच्या प्रतिज्ञापत्रात उल्लेख नाही. अर्जदार ही सध्या कोणतीही नोकरी करते व तिला नोकरीतून उत्पन्न मिळते याबाबत जाबदेणार यांनी कोणताही पुरावा दिलेला नाही. अर्जदार ही जाबदेणार यांच्याकडे असताना नोकरी करत होती ही बाब अर्जदार हीस मान्य आहे. परंतु, अर्जदार माहेरी राहत असलेपासून तिला उत्पन्नाचे काही साधन आहे असे दिसून येत नाही. जाबदेणार यांनी त्यांचेवरील जबाबदा–या दर्शविण्यासाठी निशाणी क्र. ५८ सोबत काही वैद्यकीय कागदपत्रे दाखल केलेली आहेत. दोन्ही पक्षकारांचे प्रतिज्ञापत्रावरुन त्यांना असलेल्या उत्पन्नाबाबत व आर्थिक जबाबदा–याबाबत दिसून येत आहे.

२३. अर्जदारतर्फे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, जाबदेणार यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद केले आहे की, त्यांच्याकडे उत्पन्नाचे साधन नाही व ते आईवर अवलंबून आहेत. परंतु, जाबदेणार क्र. १ यांना बँकेने दिलेले कर्ज विचारात घेतले असता जाबदेणार क्र.

१ यांची ऐपत दिसून येते. अर्जदार तर्फे विधिज्ञांनी केलेल्या युक्तीवादामध्ये तथ्य दिसून येते. जाबदेणार क्र. १ यांची आर्थिक ऐपत नसताना, कर्ज फेडण्याची कुवत नसताना बँकेने त्यांना कर्ज दिले ही बाब विश्वासर्ह वाटत नाही. जाबदेणार क्र. २ हिचे वैयक्तिक उत्पन्न दिसून येते त्यामधून जाबदेणार क्र. २ स्वतःचा उदरनिर्वाह चांगल्या प्रकारे करु शकतील. जाबदेणार क्र. २ चे शिक्षण शारिरीक कुवत, वयोमान विचारात घेतले असता कोणताही कामधंदा करुन जाबदेणार क्र. २ हे दरमहा रक्कम रु. ३० ते ३५,०००/– रु. कमवू शकतो. कामधंदा नाही असा बचाव घेऊन अर्जदारची जबाबदारी जाबदेणार क्र. १ नाकारू शकत नाही. अर्जदार व जाबदेणार यांचे वय, दैनंदिन खर्च, वैद्यकीय खर्च, जाबदेणारच्या जबाबदा–या, अर्जदार व जाबदेणार यांचे राहणीमान, पाहता मुळ अर्जाचा निकाल होईतोपर्यत जाबदार क्र.१ याने अर्जदार हीस दरमहा रक्कम रु.८,०००/– देण्याचा आदेश करणे योग्य वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** अर्ज (निशाणी क्र. ५) अंशतः मंजूर करणेत येत आहे.

**२.** जाबदेणार यांनी अर्जदार हीस कौटुंबिक छळ संज्ञेअंतर्गत समाविष्ट कोणत्याही प्रकारचा छळ करु नये अशी ताकीद देण्यात येते.

**३.** जाबदार क्र.१ यास असे आदेशित करणेत येते की, त्याने अर्जदार हीस तुर्तातुर्त पोटगीची रक्कम म्हणून दरमहा रूपये ८,०००/– (अक्षरी आठ हजार रुपये मात्र) अर्ज दाखल तारखेपासून ते मुळ अर्ज निकाली होईपर्यंत द्यावेत.

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2026.05.29 18:04:08 +0530

दिनांक २९/०५/२०२६ **(सौ. एस. के. देशमुख)**

ठिकाण सासवड. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सासवड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of Steno : Pratik R. Shirke, Stenographer (Grade III)

Court Name : (Mrs. S. K. Deshmukh)
Civil Judge Jr. Division, Saswad.

Date of Order : 29.05.2026

Order signed by presiding officer on : 29.05.2026

Order uploaded on : 29.05.2026